# भारतीय कर व्यवस्थेची वैशिष्ट्ये

# Features of Indian Tax System

## प्रस्तावना

### (Introduction)

भारतात प्रामुख्याने केंद्र सरकार व राज्य सरकार हेच कराची आकारणी करतात. कर हेच सरकारचे उत्पन्न मिळविण्याचे प्रमुख साधन आहे. देशातील जनतेसाठी अनेक कल्याणकारी योजना राबवितांना विविध स्वरुपाचा खर्च करावा लागतो व हा खर्च करण्यासाठी सरकारला करांद्वारे उत्पन्न मिळवावे लागते. सरकार आपल्या गरजेनुसार ह्या करांचे प्रमाणही कमी जास्त करीत असते. भारतातील करव्यवस्था व करपद्धती यांचा जनतेच्या राहणीमानावर व उत्पन्नावर प्रभाव पडत असतो.

त्याचप्रमाणे समाजातील आर्थिक विषमता, समाजाचा आर्थिक विकास इत्यादींवर देखील प्रभाव पडत असतो. करांचे सर्वच परिणाम वाईटच असतात असे नाही तर चांगले परिणाम देखील घडून येत असतात. डॉ. डाल्टन यांनी म्हटल्याप्रमाणे, “आर्थिक दृष्टीकोनातून कर आकारणीची ती पद्धती सर्वोत्कृष्ट जिचे उत्तम किंवा कमीत कमी वाईट परिणाम घडून येतात.” कर व्यवस्थेचे मूल्यमापन करतांना आर्थिक दृष्टीकोनासोबतच सामाजिक दृष्टीकोनही तेवढाच महत्वाचा आहे.

## भारतीय कर व्यवस्थेची वैशिष्ट्ये

**(Features of Indian Tax System)**

### १) लवचिकतेचा अभाव

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सरकारच्या कार्यक्षेत्रात खूप वाढ झाली. देशाचा जलद गतीने आर्थिक विकास करण्यासाठी आर्थिक नियोजनाचा अवलंब केला. त्याचप्रमाणे बदलत्या परिस्थितीनुसार सरकारला नवनवीन आवाहने स्विकारावी लागली. या सर्व कारणांमुळे सरकारच्या वित्तीय गरजेत वाढ झाली. त्यामुळे सरकारने कराच्या प्रमाणात वाढ केली व त्यासोबतच नवनवीन करांची आकारणी केली आहे. एवढे करुनही सरकारच्या तिजोरीमध्ये पुरेशी भर पडू शकत नाही.

### २) अनिश्चितता

भारतातील कर व्यवस्थेचे स्वरुप अनिश्चित आहे. शेती हा भारतातील सर्वात महत्वाचा व्यवसाय आहे. तसेच उत्पन्नाचा सर्वात मोठा स्त्रोत आहे. भारतातील अनेक उद्योग व व्यवसाय हे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे शेतीवरच अवलंबून आहेत व शेती हा मान्सूनचा जुगार आहे असे नेहमीच म्हटले जाते. कारण बऱ्याच वेळा अतिवृष्टी झाल्यामुळे सर्वत्र दृष्काळाची परिस्थिती निर्माण होते. याचा अनेक उद्योग व व्यवसायावर विपरित परिणाम घडून येतो. त्यामुळे कराच्या मार्गाने सरकारला अपेक्षित उत्पन्न मिळू शकत नाही. कर आकारणीच्या मार्गाने सरकारला निश्चित असे उत्पन्न मिळेलच याची खात्री नसल्यामुळे विकास कार्यक्रमांची अंमलबजावणी पाहीजे त्या वेगाने केली जाऊ शकत नाही.

### ३) प्रतिगामी स्वरुप

कर व्यवस्थेचे ठळक उद्दिष्ट्य म्हणजे सरकारला पुरेसे उत्पन्न मिळवून देणे व समाजातील आर्थिक विषमता कमी करणे. या दोन्ही उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी भारतीय कर व्यवस्था असमर्थ आहे.

भारतीय कर व्यवस्था ही प्रतिगामी आहे. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांपैकी प्रत्यक्ष करापेक्षा अप्रत्यक्ष करांपासून सरकारला जास्त उत्पन्न मिळते. अप्रत्यक्ष करांचे विवर्तन होते. ज्या व्यक्तीवर कर लावला जातो ती व्यक्ती आपल्या कराचा भार इतरांवर ढकलतात व हा भार प्रामुख्याने गरीबांवर येऊन पडतो.

कर निर्धारणाच्या समानतेच्या तत्वाच्या संदर्भात ॲडम स्मिथचे मत असे होते की, 'श्रीमंत व्यक्तींनी आपल्या उत्पन्नाच्या विशिष्ट प्रमाणात कर दिले पाहीजे.'

श्रीमंतावर त्यांच्या करदेय क्षमतेपेक्षा कमी कर आहेत तर गरीबांवर त्यांच्या करदेयक्षमतेपेक्षा खूपच जास्त कर आहे. यामुळे गरीब व श्रीमंतामधील विषमतेची दरी वाढतच आहे.

**४) मर्यादित क्षेत्र**

भारतातील कर व्यवस्थचे क्षेत्र फार मर्यादित आहे. सरकारच्या कराचा संपूर्ण लोकसंख्येवर परिणाम घडून येत नाही. कर आकारणीच्या विभिन्नतेच्या तत्वानुसार कर प्रणालीचे स्वरुप व्यापक असावे ज्यामुळे समाजातील कर देण्याची क्षमता असलेल्या प्रत्येक व्यक्तीवर कराचा योग्य तो भार पडेल. या विभिन्नतेच्या तत्वाचे पालन व्यवस्थितरित्या न केल्यामुळे करव्यवस्थेचे क्षेत्र मर्यादित राहीले.

**५) अप्रत्यक्ष करांचे प्राबल्य**

करांचे प्रत्यक्ष कर व अप्रत्यक्ष कर असे दोन प्रकार आहेत. १८ व्या शतकात अप्रत्यक्ष करप्रणाली बरीच लोकप्रिय झाल्यांमुळे सरकार कर रुपाने उत्पन्न मिळविण्यासाठी अप्रत्यक्ष करांचाच उपयोग करीत होते. १९ व्या शतकात पुन्हा प्रत्यक्ष करांच्या बाजूने विचार प्रवाह होते.

भारतातील कर व्यवस्थेचा विचार केल्यास प्रत्यक्ष करांच्या तुलनेत अप्रत्यक्ष करांचे प्राबल्य दिसून येते. हा भारतीय कर व्यवस्थेचा महत्वाचा दोष आहे. केंद्र सरकार, राज्य सरकार व स्थानिक स्वराज्य संस्थांना करांपासून मिळणाऱ्या एकूण उत्पन्नापैकी फक्त २४ टक्के उत्पन्न प्रत्यक्ष करांपासून मिळते. इंग्लंडमध्ये हे प्रमाण ५५ टक्के व ऑस्ट्रेलिया व जपानमध्ये ७० टक्के आहे. भारतात मात्र अप्रत्यक्ष करांवरच राहणे पसंत केल्याचे दिसते.

### ६) करांचे वेगवेगळे दर

प्रत्येक राज्य सरकार आपले धोरण स्वतंत्रपणे आखते. त्याचप्रमाणे प्रत्येक राज्य सरकार आपल्या अंदाजपत्रकात आलेली तूट भरुन काढण्यासाठी नवीन करांची आकारणी करु शकते. उदा. विक्रीकर प्रत्येक राज्यात वेगवेगळा आहे. त्याचप्रमाणे उत्पादन कर ही वेगवेगळा आहे. काही राज्यांनी शेती उत्पादनावर कर बसविला तर काही राज्यांनी शेती उत्पन्नावर कर बसविला नाही. अशा प्रकारे निरनिराळ्या राज्यांचे करांचे वेगवेगळे दर आहेत.

### ७) शेतीक्षेत्राच्या क्षमतेकडे दुर्लक्ष

भारतात एकूण राष्ट्रीय उत्पन्नात नियोजनाच्या सुरुवातीच्या कालावधीत शेती क्षेत्राचा वाटा निम्मा होता. योजना काळात सरकारने शेती क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली. सिंचनाच्या सोयी, आधुनिक बि-बीयाणांचा वापर, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर त्यामुळे शेतीची उत्पादकता सुद्धा वाढली आहे. परंतु

सरकारला करांच्या मार्गाने मिळणाऱ्या एकूण उत्पन्नात शेती क्षेत्राचा वाटा अल्प आहे.

### ८) पुरातन (सनातन) पद्धती

हे कर आकारणीचे महत्वाचे तत्व आहे. उत्पादकतेचे तत्व म्हणजे सरकार जे कर लावते त्यात उत्पादकता असावी. म्हणजेच सरकारला त्या करांपासून पुरेसे उत्पन्न मिळवून देण्याची क्षमता असावी. ज्या करांना जनतेचा विरोध असतो अशा करांचे उच्चाटन करणेच योग्य ठरते. भारतातील कर व्यवस्था अजूनही पुराणमतवादी (Conservative) आहे. त्यामुळे नवीन उत्पादक करांची आकारणी व जुन्या करांचे उच्चाटन याबाबत योग्य ते निर्णय घेतले जात नाही.

### ९) अशास्त्रीय पद्धती

विशिष्ट करांची आकारणी करतांना प्रथम त्या कराचे रोजगारीच्या पातळीवर, उत्पादनावर, उपभोगावर, संपत्तीच्या वितरणावर कोणते परिणाम घडून येण्याची शक्यता आहे या सर्वांचा पूर्ण विचार करुनच कर आकारणी केली पाहीजे अन्यथा कर व्यवस्थेचे स्वरुप शास्त्रीय राहू शकत नाही. परंतु फक्त अंदाजपत्रकातील तूट भरुन काढणे हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवूनच आपल्या देशात कर आकारणी केली जाते. करांच्या परिणामाकडे दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे आपल्या देशातील कर व्यवस्थेचे स्वरुप अशास्त्रीय आहे.

### १०) अकार्यक्षमता

आपल्या देशातील प्राप्ती कराच्या संदर्भात विचार केल्यास प्राप्ती कराचे दर उत्पन्नाच्या वरच्या पातळीवर बरेच जास्त आहे. त्यामुळे करदाते कायद्यामधील पळवाटी शोधतात व कर टाळण्याचा व बुडविण्याचा प्रयत्न करतात.

प्रा. कॅल्डोर यांच्या मते आपल्या देशात दरवर्षी २०० ते ३०० कोटी रुपयांचा प्राप्तीकर बुडविला जातो. दिवसेंदिवस या प्रमाणात वाढ होत आहे. करदाते मोठ्या प्रमाणात कर बुडवित असल्यामुळे देशात काळ्या पैशाची समांतर अर्थव्यवस्था निर्माण होत आहे.

## अपेक्षित प्रश्न

**दिर्घोत्तरी प्रश्न**

१) भारतीय कर व्यवस्थेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

**लघुत्तरी प्रश्न**

१) आपल्या देशात अप्रत्यक्ष कराचे प्राबल्य आहे काय स्पष्ट करा.

२) 'भारतीय कर व्यवस्थेमध्ये उत्पादकता नाही' स्पष्ट करा.

३) भारतीय कर व्यवस्था अशास्त्रीय आहे काय स्पष्ट करा.